वि.दि.दा. क्र.४३९/२०२२
मोहनलाल वि. आयुक्त
नि.क्र.२७

<u>प्रतिवादी क्र.१ करिता उलटतपासणी ॲड. श्री. येरटे यांचेमार्फत पुन्हा सुरु</u>

१२. मागच्यावेळेस माझा उलटतपास झाल्यानंतर त्याची नक्कल वकिलांमार्फत काढुन घेतली व वाचली हे खरे आहे. माझा उलटतपास वाचल्यानंतर त्याच्यातील चुकांची जाणिव झाल्यामुळे नंतर कागदपत्र दाखल केले हे खरे नाही. माझी उलटपासणी होण्यापुर्वी मी दाखल केलेले कागदपत्रे माझ्याकडे होते हे खरे आहे. माझे मोठे बंधु लातुर येथील नामांकीत सी.ए. आहेत हे खरे आहे. माझे व माझ्या कुटूंबियाचे आयकर विवरण पत्र भरण्याचे व ताळेबंद पाहण्याचे काम माझे मोठे बंधु बघतात हे खरे नाही. मी आयकरचे सन २०१९–२०, २०२०–२१, २०२१–२२ व फायदा व नुकसानीचे ताळेबंद दिनांक ०१/०४/२०२१ ते ३१/१०/२०२१ चे दाखल केले आहेत परंतु त्याच्यावर सी.ए. याची सही अथवा शिक्का नाही. जी.एस.टी. चे दरमहा विवरण पत्र दाखल केले असुन त्यावर कोणाचाही सही, शिक्का नाही. मी दाखल केलेल्या बिलावर ज्या व्यक्तीच्या नावाने बिल आहे त्या व्यक्तीची सही नाही. मी महाराष्ट्र स्टेशनर्स या नावाने बिल दाखल केले आहे परंतु त्याच्यावर महाराष्ट्र स्टेशनर्स च्या मालकाची सही अथवा शिक्का नाही. मी दाखल केलेल्या महाराष्ट्र स्टेशनर्स, बाफना व्हेंचर्स प्रा.लि., सतिष रोडवेज अॅण्ड ट्रान्सपोर्ट तसेच पी.बी.बाफना या नावाने असलेल्या डिलीव्हरी चलनावर सहया अथवा शिक्का नाही. मी बियाणे सेल्सच्या नावाने दाखल केलेल्या बिलावर सही व शिक्का नाही. मी दाखल केलेली सर्व बिले संगणकाद्वारे काढण्यात आलेली आहेत हे खरे आहे. दुकान मालकाचा शिक्का बिलावर नाही हे खरे आहे. माझा उलटतपास झाल्यानंतर सर्व कागदपत्रे तयार करुन दाखल केली हे म्हणणे खरे नाही. घटना घडली त्यावेळेस माझ्या दुकानात माल नव्हता हे खरे नाही. महापालिका व

पुर्वीच्या मालकाकडून पैसे उकळण्यासाठी खोटा दावा केला आहे हे खरे नाही. मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे हे खरे नाही.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

**स्वाक्षरीत/–**

फेरतपास नाही.

( एफ.के.शेख )

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

लातूर.

दिनांकः ०६/०८/२०२६.

* * *